पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited 2015
'B' Grade (CGPA -2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University,Solapur

केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स) विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०.
: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in



## विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development

जावक्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२३-२४/ 7033 दि. 25 SEP 2023

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्न महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय:- युवा महोत्सवातील पाश्चिमात्य समूहगायन** (Western Group Song) **या कलाप्रकाराच्या नियमावलीबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, प्रस्तूत विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव दि.१० ते १३ आक्टोबर २०२३ दरम्यान स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथे संपन्न होत आहे. तरी युवा महोत्सवासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीत पाश्चिमात्य समूहगायन (Western Group Song) या कलाप्रकारासाठी खालील नियम देण्यात आले आहेत.

| ७. पाश्चिमात्य समूहगान (Western Group Song) | |
|---|---|
| १ | प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल. |
| २ | एका संघामध्ये किमान ४ (चार) व कमाल ६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील तथापि, गायक हे सादरीकरणा दरम्यान वाद्ये वाजवू शकतील. |
| ३ | समूहगान मध्ये विद्यार्थी दिलेल्या वेळेत एकापेक्षा अनेक गीते सादर करु शकतील. चित्रपटगीते सादर करता येतील. |
| ४ | सादरीकरणाकरिता किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटे वेळ दिला जाईल ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि, मंच व वाद्य रचनेकरिता ५ (पाच) मिनीटाचा अधिक कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल. |
| ५ | ~~प्रत्येक चमूला दोन गाण्याचे सादरीकरण करावे लागेल. ज्यामध्ये एक देशभक्तीपर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारीत राहील.~~ |

**तरी उपरोक्त तक्त्यातील नियम क्र ५ हा रदद् करण्यात आला असून त्याची नोंद घ्यावी** तसेच दि.०४/०९/२०२३ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत योग्य त्या सूचना आपल्याकडून संघव्यवस्थापक तसेच विद्यार्थ्यांना द्याव्यात व आपल्या विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव २०२३-२४ यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे.

आपला स्नेहांकीत

**[डॉ. केदारनाथ काळवणे]**
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग